नांदेड जिल्हा नियोजन समितीवर विशेष निमंत्रितांची नियुक्ती करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन निर्णय क्रमांक: डिएपी-२०१९/प्र.क्र.२०/का.१४८१-अ,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ०६ मार्च, २०१९

पहा:- १) महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (रचना व कामे) १९९८,
२) महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (रचना व कामे) (सुधारणा) अधिनियम २०००
३) जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, नांदेड,यांचे पत्र क्र.जिनिस/कासनास/का-२/२०१८-१९/ कावि-१३६, दि.१५/०१/२०१९

शासन निर्णय :-

"महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (रचना व कामे) (सुधारणा) अधिनियम, क्रमांक ३०/२०००" मधील कलम ३ चा पोटकलम (३)(चार)(फ) येथिल तरतूदीनुसार सोबत जोडलेल्या विवरणपत्र"अ"मध्ये दर्शविलेल्या, जिल्हा नियोजनाचा अनुभव असलेल्या व सामान्यपणे जिल्हा नियोजन समितीच्या क्षेत्रातील निवासी असलेल्या १५ व्यक्तिंची "विशेष निमंत्रित" म्हणून नांदेड जिल्ह्याच्या जिल्हा नियोजन समितीवर नियुक्ती करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, नांदेड यांनी उपरोक्त आदेश सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावेत.

३. जिल्हा नियोजन समितीवर वरील नमूद विशेष निमंत्रित यांच्या करण्यात आलेल्या नियुक्त्या पुढील आदेश होईपर्यंत किंवा शासनाकडून सदर नियुक्त्या रद्द होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल, तोपर्यंत अबाधित राहतील.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०३०६१६३८५२७४१६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने

VIJESING FATTESING VASAVE

Digitally signed by VIJESING FATTESING VASAVE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PLANNING DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5494d2ad3a3bc5ddd66daf9a8f17ceec5e2d7d4b6a8bba99c51d275801bcdf1b, cn=VIJESING FATTESING VASAVE
Date: 2019.03.11 18:42:28 +05'30'

(वि.फ.वसावे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,
३. मा. मंत्री (नियोजन) यांचे खाजगी सचिव,
४. मा. राज्यमंत्री (नियोजन) यांचे खाजगी सचिव

५. मा. पालक मंत्री तथा अध्यक्ष, जिल्हा नियोजन समिती,नांदेड यांचे खाजगी सचिव
६. मा. मुख्यसचिव, मंत्रालय, मुंबई
७. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग
८. जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, नांदेड
९. उपआयुक्त (नियोजन), विभागीय आयुक्तांचे कार्यालय, औरंगाबाद विभाग
१०.जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड
११.महालेखापाल, महाराष्ट्रराज्य, मुंबई/नागपूर,
१२.जिल्हा कोषागार अधिकारी, नांदेड
१३.निवडनस्ती, का-१४८१अ.

शासन निर्णय, क्रमांक:डिएपी-२०१९/प्र.क्र. २० /का.१४८१-अ,
दिनांक : ०६ मार्च, २०१९ सोबतचे विवरणपत्र

विशेष निमंत्रित:-

अ.क्र.	विशेष निमंत्रितांचे नांव	पत्ता
१.	श्रीम.सुर्यकांताबाई जयवंतराव पाटील	मु.पो.पाटणूरनगर, ता.नांदेड, जि. नांदेड
२.	डॉ.संतुकराव मारोतराव हंबर्डे	मु.पो.विष्णुपुरी, ता.नांदेड, जि. नांदेड
३	श्री.लक्ष्मण गंगाराम ठक्करवाड	मु.पो. कासराळी, ता.बिलोजी,जि. नांदेड
४	श्री.बळवंतराव माधवराव पाटील	मु.पो.बेटमोगरा, ता.मुखेड, जि. नांदेड
५	श्री. प्रविण चक्रधर साले	मु.पो.शाकुंतल ६५ भाग्यनगर , ता.नांदेड, जि. नांदेड
६	श्री.राजु शरणप्पा गंदिगुडे	मु.पो. नरसी,ता.नायगांव (खै.), जि. नांदेड
७	श्री.बाबाराव अमृतराव रोकडे	मु.पो. रामतिर्थ, ता.बिलोली,जि. नांदेड
८	श्री. दत्ता भुजंगराव कोकाटे	मु.पो. सांगवी, ता.नांदेड, जि. नांदेड
९	श्री. आनंद शंकराव तिडके	मु.पो.बोंढार, ता.नांदेड, जि. नांदेड
१०	श्री. निखील वसंतराव लातुरकर	मु.पो.अशोकनगर,नांदेड, ता.नांदेड, जि. नांदेड
११	श्री. वसंत ईरन्ना संबुटवाड	मु.पो.तबेला गल्ली,मुखेड ता.मुखेड, जि. नांदेड
१२	श्री. दिलीपराव गणपतराव देबगुंडे	मु.पो.सोनाळा ता.हदगांव, जि. नांदेड
१३	श्री. अशोक मोरे	मु.पो.बाबुलगांव ता.नांदेड, जि. नांदेड
१४	श्री.शिवाजी कदम	मु.पो.तुप्पा ता.नांदेड, जि. नांदेड
१५.	श्री. किरण नरहरी वट्टमवार	ता.लोहा, जि. नांदेड

****